# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

(ISO 9001:2008 प्रमाणित)

पत्र पेटी क्र -५१६ औरंगाबाद - ४३१ ००५

(०२४०)२३३४२१६(P) २३३४७६९(O) Fax-२३५६८२०

website : http://www.dteau.org email : roaurangabad@dtemaharashtra.gov.in


जाक्र/विकाऔ/शिक्षण/२०१८/ १७६३

दिनांक :- 2 AUG 2018

प्रति,

**प्राचार्य,**

**शासकीय व शासन अनुदानित विना-अनुदानित,**

**पदविका,पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या संस्था**

**औरंगाबाद विभाग**

**विषय :-** राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेच्या प्रभावी अंमलबजावणी बाबत.

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये सुचित करण्यात येते की, महाराष्ट्र शासनातर्फे समाजातील आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांसाठी राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत विविध अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेणा-या विद्यार्थ्यांना नियमानुसार शैक्षणिक शुल्क प्रतिपुर्ती अनुज्ञेय आहे. तसेच डॉ.पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजनेंतर्गत विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता देय आहे.

आपल्या महाविदयालयामध्ये प्रवेश घेऊ इच्छिणा-या विदयार्थ्यासाठी शासनाव्दारे विविध प्रकारच्या ज्या शिष्यवृत्ती योजना राबविल्या जातात, त्याची माहिती विदयार्थ्यांना होण्यासाठी संस्थेत समुपदेशन कक्ष (Counseling Cell ) स्थापन करण्यांत यावा. सदर समुपदेशन कक्षात विदयार्थ्याशी चांगल्या पद्धतीने संवाद साधू शकणा-या शिक्षकांचा/प्राध्यापकांचा समावेश करण्यात यावा. तसेच योजनेच्या माहितीचे फलक दर्शनी ठिकाणी लावावेत व कार्यपुर्ती अहवाल या कार्यालयास सादर करावा.

**(महेश शिवणकर)**
प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

प्रत:-१. मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.

२. मा.जिल्हाधिकारी,जिल्हाधिकारी कार्यालय,औरंगाबाद/जालना/परभणी/हिंगोली/नांदेड/लातूर/उस्मानाबाद/बीड यांना माहितीस्तव सविनय सादर.

३. या कार्यालयाचे प्रोग्रामर यांना संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यासाठी.